१२७

म.जिल्हाधिकारी सो.धुळे भागधुळेयांचेकडीलआदेशक्रमांक/ब/कक्ष१/बिनशेती//एनएएसआर/२४/२०१७,
कावी/४८८/२०१८ दिनांक १८/०५/२०१८

नियम पांच

(नियम ७ पहा)

**नियोजन प्राधिकाऱ्याचा अधिकारितेत असलेल्या जमिनीच्या धारकाला द्यावयाचा सनदेचा नमुना**

ज्याअर्थी **धुळे** जिल्हाचा **धुळे** तालुक्यातील **वलवाडी** गावातील भूमापन क्रमांक **१५२/१,१५२/२,१५२/३,१५२/४** चे वरिष्ट धारक /भोगवटदार /कुळ/ज्याचा यापुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात आला आहे आणि संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या सज्ञेत त्यांचे वारस मृत्यूपत्र व्यवस्थापन, कारभारी आणि अभिहस्तांकित यांचा समावेश होईल असलेले रा.धुळे ता. जि.धुळे येथील रहिवाशी **अष्टविनायक लॅण्ड डेव्ह.चे भागीदार श्री सुनील शांतीलाल अग्रवाल वैगरे १० रा.धुळे (अर्जदार)**यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ (ज्यांचा यात पुढे "उक्त महसूल अधिनियम " असाउल्लेख करण्यात आला आहे व त्या सज्ञेत संदर्भानुसार अनुज्ञेय असल्यास त्या अन्वयेचे नियम व आदेश याचा समावेश होतो ) याचा कलम 44 अन्वये,या सोबतच्या परिशिष्ट एकमध्ये वर्णन केलेल्या आणि जागेच्या नकाशावर अ ब क ड या लाल रंग अक्षरांनी दर्शविलेल्या भूमापन क्रमांक १५२/१,१५२/२,१५२/३,१५२/४ चे एकूण क्षेत्र **२ हे ०८ आर (२०८०० चौ.मी.)** क्षेत्रफळ असलेल्या किंवा या पेक्षा थोड्या कमी अधिक मापाच्या असलेल्या भूखंडाचा (ज्याचा यापुढे उक्त भूखंड असा उल्लेख करण्यात आला आहे.) **रहिवास** या प्रयोजनासाठी वापर करण्याच्या परवानगीकरिता **म.जिल्हाधिकारी सो.धुळे भाग धुळे** (ज्याचा यापुढे जिल्हाधिकारी असा उल्लेख केला असून त्या सज्ञेत याअधिकार पत्रानव्ये त्याच्या शक्तीचा वापर करणेसाठी व कर्तव्य पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी ज्यास नियुक्त करील अश्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ) अर्ज केला आहे.

त्याअर्थी **धुळे महानगरपालिका धुळे यांनी** इमारतीच्या बांधकामास परवानगी दिलेली आहे. त्याअर्थी आता , असे प्रमाणित करण्यात येते की ,उक्त अधिनियमाच्या उक्त बाबीस अधीन राहून आणि पुढील शर्तीवर उक्त भूखंड **रहिवास** प्रयोजनासाठी परवानगी देण्यात येत आहे.

**1) जमीन समतल करणे व ती साफ करणे** -ज्या साठी परवानगी देण्यात आली आहे त्या विशिष्ट अकृषिक प्रयोजनात योग्य होण्यासाठी व आरोग्य विघातक परिस्थितीस प्रतिबंध होण्यासाठी जमीन पुरेशी समतल व साफ करण्यास अर्जदार बांधलेला असेल.

**2)आकारणी -** अर्जदार उक्त भूखंडाच्या संबंधात यापूर्वी बसविण्यात आलेल्या आकारणीऐवजी राज्यशासनाला दिनांक **०१-०८-२०१७** पासून सुरु पंधरा वर्षाच्या मुदतीमध्ये दरवर्षी प्रति चौ.मी. रु. ०.८० पै. प्रमाणे दरवर्षी रुपये **१६६४०** +लो.फंड रुपयांची **(अक्षरी :- सोळा हजार सहाशे चाळीस +लोकल फंड मात्र )** वार्षिक आकारणी येईल आणि उक्त पंधरा वर्षाची मुदत संपल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडून उक्त अधिनियमान्वये वेळोवेळी निश्चित करण्यात येईल अशी सुधारित आकारणी देईल.

Scanned by CamScanner

3)वापर-अर्जदाराने **रहिवास** (ज्या प्रयोजनासाठी परवानगी देण्यात आली असेल ते विशिष्ट प्रयोजन येथे लिहावे) याव्यतिरिक्त असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमिनीचा आणि त्यावर उभारलेल्या किंवाउभारावयाच्या इमारतीचा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व मंजुरीशिवाय वापर करता कामा नये. अर्जदाराने या सोबतच्या परिशिष्ट 2 मध्ये असलेल्या शर्तीचे यथोचितरित्या पालन केले पाहिजे .

**4)बांधकामाबाबतची कालमर्यादा -** अर्जदाराने या अधिकारपत्राच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आत उक्त भूखंडावर भरीव कायम स्वरूपाचे बांधकाम सुरू केले पाहिजे .त्याने तसे न केल्यास जिल्हाधिकाऱ्यांकडून वेळोवेळी मुदत वाढविण्यात आली नसेल तर देण्यात आलेलीपरवानगी रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

**5) पट्टी देण्यासंबंधीचे दायित्व :-** अर्जदाराने उक्त जमिनीवर आकारणे जोगे सर्व कर पट्ट्या आणि उपकर दिले पाहिजेत.

**6) शास्ती विषयक खंड :- (अ )** अर्जदाराने पूर्व अटी शर्ती पैकी कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये अर्जदार ज्या शिक्षेस पात्र होईल अश्या इतर कोणत्या ही शिक्षेस बाध न आणता जिल्हाधिकारी जो निर्देशित करील असा दंड किंवा अशी आकारणी रक्कम व उक्त अधिनियमाचे कलम 329 चे पोटकलम (2)ला अधीन राहून तो निर्देशित करील असा दंड भरल्यावर उक्त भूखंड अर्जदाराच्या ताब्यातच चालू ठेवता येईल.

(ब) उपखंड (अ)मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिकारपत्राच्या उपबंधाविरुद्ध कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभारण्यात आल्यास किंवा वापरण्यात आल्यास जिल्हाधिकाऱ्याने विशिष्ट केलेल्या मुदतीत काढून टाकण्याबाबत किंवा त्यात बदल करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्याने निर्देश देणे हे वैध्य असेल आणि विनिदिष्ट मुदतीत अश्या प्रकारे (इमारत किंवा बांधकाम ) काढून टाकण्यात आले किंवा नाही त्यात ब दल करण्यात आला नाही तर त्याला ते काढून टाकण्याची किंवा त्यात बदल करण्याची व्यवस्था करता येईल आणि त्याबाबतचा खर्च अर्जदाराकडुन जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल.

7) अधिनियमाचे उपबंध लागू करणे - यात उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त हे अधिकारपत्र उक्त अधिनियमाच्याआणि त्या खालील नियमांच्या उपबंधावर अधिन असेल.

Scanned by CamScanner

नकाशा







येणेप्रमाणे असे

दि:- / /२०१८

मंडळ अधिकारी
भाग धुळे शहर

| परिशिष्ट एक | | | |
|---|---|---|---|
| गट.नं. | पृष्ठभागाचे एकूण क्षेत्रफळ | सीमा उत्तर -दक्षिण पूर्व -पश्चिम | शेरा |
| मौजे- वलवाडी ता.जि.धुळे येथील ग. नं. १५२/१,१५२/२,१५२/३,१५२/४ मधील | हे. आर २-०८ चौ. मी २०८०० | उत्तरेस :- ग.नं. १५१<br>दक्षिणेस :- ग.नं. १२३<br>पुर्वेस :- रस्ता<br>पश्चिमेस :- ग.नं. १५३ | |

Scanned by CamScanner

## परिशिष्ट- दोन

(नियम ४(१) मधील शर्त (ई) पहा )

(लागू असलेल्या शर्ती,अधिकारपत्राच्या शर्त ४ मध्ये नमूद करता येतील आणि विशेष शर्ती त्यानंतर लगेच सामाविष्ट करण्यात येतील)

१) अर्जदार ईमारतीच्या प्रमाणाचे आणि नियंत्रण रेषांचे पालन करील आणि सोबतच्या नकाशावरील लाल रंगा ने चिन्हांकित केलेल्या क्षेत्रावर ईमारत बांधील आणि उक्त भूखंडाचे उर्वरित क्षेत्र मोकळी जागा म्हणून ठेवील.

२) उक्त भूखंडाचा छताचा भाग वरील बाजूने उघडा राहील.

३) उक्त भूखंडावर बांधण्यात आलेला कोणताही शौचकूप,मलकुंडी किंवा तबेले हे सोबतच्या नकाशात अश्या प्रयोजनाकर्ता कोणतीही जागा अलग ठेवण्यात आली असेल तर जागेवरच बांधण्यात आले पाहिजेत आणि इतरत्र बांधण्यात येवू नये.

४) उक्त भूखंडावर कोणतीही ईमारत ११ मीटर पेक्षा अधिक उंच उभारण्यात येणार नाही.

५) उक्त भूखंडावर उभारलेली कोणतीही ईमारत केवळ रहिवास/वाणिज्य प्रयोजनाकरिताच वापरण्यात येईल.

६) उक्त भूखंडावर उभारलेली कोणतीही ईमारत दुकान म्हणून किंवा कारखाना म्हणून किंवा अपराधिक व्यापार चालू ठेवण्याचे ठिकाण म्हणून वापरण्यात येणार नाही.

७) हे अधिकारपत्र खालील शर्तीच्या अधीन असेल.(येथे नियम ४(२)(ई) अन्वये लादलेल्या इतर शर्ती आणि नियम ४ (७ फ )अन्वये च्या विशेष शर्ती कोणत्याही असल्यास नमूद करावयात.)

८) म.जिल्हाधिकारीसो.धुळेभागधुळेयांचेकडीलआदेशक्रमांक/ब/कक्ष१/बिनशेती/एनएएसआर/२४/२०१७, कावी/४८७/२०१८ दिनांक १८/०५/२०१८ मधील सर्व अटी शर्ती.

या गोष्टींची साक्ष म्हणून अपर तहसिलदार धुळे शहर (प्राधिकृत अधिकारी) यांनी महाराष्ट्र राज्यपाल यांच्या वतीने आपली सही केली आहे आणि आपल्या पदाची मोहोर लावली आहे आणि अर्जदाराने सुद्धा यावर दि. २६/०६/२०१८ रोजी आपली सही केली आहे.

| | समक्ष | अर्जदाराची सही |
|---|---|---|
| २८.९.१८ | २६/०६/१८ | |
| अपर तहसिलदार धुळे शहर | मंडळ अधिकारी धुळे शहर | |

अपर तहसिलदार धुळे शहर आम्ही असे जाहीर करतो की,जिने या सनदेवर सही केली आहे ती अ,ब ही व्यक्ती आमच्या वैयक्तीक माहितीप्रमाणे ती जी व्यक्ती असल्याचे म्हणत आहे आणि तिने आमच्या समक्ष सही केली आहे.

साक्षीदाराच्या सह्या

१) ...............

२) ...............

Scanned by CamScanner